# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १६ मार्च २०२४

## ( बैठक क्र. ६९ )

| अक्र | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | वृद्ध साहित्यिक व कलाकारांना ५ हजार रुपये मानधन | सांस्कृतिक कार्य |
| २ | शासकीय, निमशासकीय जागांवर आता मोफत चित्रीकरण | सांस्कृतिक कार्य |
| ३ | राज्य शिखर संस्थेच्या कळंबोलीतील इमारतीसाठी शुल्क माफी | उद्योग |
| ४ | तात्पुरत्या स्वरूपातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमित करणार | वैद्यकीय शिक्षण |
| ५ | १३८ जलदगती न्यायालयांसाठी वाढीव खर्चाला मान्यता | विधि व न्याय |
| ६ | मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास दंड सुद्धा वाढविला | गृह |
| ७ | संस्कृत, तेलुगू, बंगाली, गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापणार | सांस्कृतिक कार्य |
| ८ | विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ ५० कोटी भागभांडवल | इतर मागास |
| ९ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या भाग भांडवलात भरीव वाढ | पशुसंवर्धन |
| १० | हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे उच्चाटन करणार : रोबोटिक स्वच्छता यंत्रांची मॅनहोलकडून मशीनहोल योजना | सामाजिक न्याय |
| ११ | ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ ५० कोटी अनुदान | परिवहन |
| १२ | संगणक गुन्हे तातडीने निकाली निघणार - सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग प्रकल्प राबविणार | गृह |
| १३ | राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करणार | गृह |
| १४ | भुलेश्वरची जागा जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला जिमखान्यासाठी वाटप | महसूल |
| १५ | संगणकीय न्याय सहाय्यक विज्ञान उत्कृष्टता केंद्र उभारणार गुन्ह्यांची वेगाने उकल करणार | गृह |
| १६ | राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कल्याण केंद्रासाठी २० कोटी अतिरिक्त निधी मंजूर | सामान्य प्रशासन |
| १७ | श्रीगोंदा तालुक्यातील शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित | महसूल |

सांस्कृतिक कार्य

## वृद्ध साहित्यिक व कलाकारांना ५ हजार रुपये मानधन

राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजनेत सुधारणा करून ५ हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी १२५ कोटी इतक्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली. सध्या या योजनेत अ वर्ग कलावंतास ३ हजार १५०, ब वर्ग कलावंतास २ हजार ७००, क वर्ग कलावंतास २ हजार २५० मानधन देण्यात येईल.

-----०-----

सांस्कृतिक कार्य

## शासकीय, निमशासकीय जागांवर आता मोफत चित्रीकरण

शासकीय, निमशासकीय जागांवर आता मोफत चित्रीकरण करता येईल. यासंदर्भात आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

चित्रिकरणातून विविध विभागांना वर्षभरात साधारणपणे ८ कोटी १० लाख महसूल मिळतो. राज्यातील प्रतिभावान मनुष्यबळ राज्यातच रोखून ठेवणे, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत चित्रपट निर्मिती संस्थांना आकर्षित करणे यासाठी हा निर्णय घेण्यात आला. यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित संस्था, महामंडळे यांच्या जागा मराठीसह देशविदेशातील अन्य भाषांतील चित्रपट, दूरदर्शन, जाहिरातपट व माहितीपट चित्रिकरणासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येतील. यासाठी चित्रपट निर्मात्यांना गोरेगावच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या सिंगल विंडो मध्ये अर्ज करावा लागेल व अनामत रक्कम भरावी लागेल.

-----०-----

उद्योग विभाग

## राज्य शिखर संस्थेच्या कळंबोलीतील इमारतीसाठी शुल्क माफी

राज्य शिखर संस्थेच्या कळंबोलीतील इमारतीसाठी (महाराष्ट्र हब) सिडको तसेच पनवेल महानगरपालिका यांच्याकडून आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्र हब हा एक महत्त्वकांक्षी प्रकल्प असून यामुळे राज्यात गुंतवणूक, रोजगार तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास होण्यास हातभार लागणार आहे. या निर्णयामुळे सिडकोचे ४८ कोटी ९४ लाख ३१ हजार ४४४ एवढे शुल्क तर पनवेल महापालिकेचे ४६ कोटी ९३ लाख २५ हजार २३९ विकास शुल्क माफ करण्यात आले आहे.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## तात्पुरत्या स्वरूपातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमित करणार

तात्पुरत्या स्वरूपातील गट ब मधील ६४ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संस्थांमध्ये काही पदे अतिरिक्त असून नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन होताना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयाच्या हस्तांतरणाच्या वेळी ही पदे या विभागाकडे वर्ग झाली आहेत. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार ही पदे आवश्यक नाहीत. अशी ६४ पदे वैद्यकीय अधिकारी गट ब या पदांमध्ये रुपांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----o-----

विधि व न्याय विभाग

## १३८ जलदगती न्यायालयांसाठी वाढीव खर्चाला मान्यता

१३८ जलदगती न्यायालयांसाठी ४७ कोटी २५ लाख इतक्या वाढीव खर्चास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या न्यायालयांकरिता मंजूर पदांना ३१ ऑगस्ट २०२३ नंतर पुढील ५ वर्षांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देखील देण्यात येईल.

-----o-----

गृह विभाग

## मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास दंड सुद्धा वाढविला

मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास आणि २० हजार रुपये दंड अशी सुधारणा महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकिरता अधिनियम १९९५ च्या कलम ३ मध्ये करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या यासाठी ३ महिने कारावास किंवा २ हजार रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद आहे.

-----o------

सांस्कृतिक कार्य

## संस्कृत, तेलुगू, बंगाली, गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापणार

संस्कृत, तेलुगू, बंगाली, गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या अकादमीसाठी प्रत्येकी एक कोटी रुपये खर्चास तसेच आवश्यक त्या पदांना देखील मान्यता देण्यात आली.

-----o-----

इतर मागास विभाग

## विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ
## ५० कोटी भागभांडवल

विणकर समाजासाठी स्वतंत्र विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून ५० कोटी भागभांडवल देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या महामंडळावर अध्यक्ष व उपाध्यक्षांसह ३ अशासकीय सदस्य आणि ७ शासकीय सदस्य राहतील.

-----०-----

पशुसंवर्धन विभाग

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व
## मेंढी विकास महामंडळाच्या भाग भांडवलात भरीव वाढ

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या भाग भांडवलात भरीव वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या महामंडळाचे भागभांडवल २५ कोटी रुपये आहे ते आता ९९ कोटी ९९ लाख इतके होईल.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे उच्चाटन करणार
## रोबोटिक स्वच्छता यंत्रांची मॅनहोलकडून मशीनहोल योजना

हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी रोबोटिक स्वच्छता यंत्रे तसेच यांत्रिक उपकरणे आणि स्वच्छता युनिट वाहने खरेदी करण्याच्या मॅनहोलकडून मशीनहोल या योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

पहिल्या टप्प्यात सर्व महापालिका अ आणि ब वर्ग नगरपरिषदा आणि उपलब्ध निधीनुसार क वर्ग नगरपरिषदा घेण्यात येतील. तर दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात उर्वरित क वर्ग नगरपरिषदा आणि नगरपंचायती घेण्यात येतील. यासाठी ५०२ कोटी ४० लाख रुपये खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

परिवहन विभाग

## ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ
## ५० कोटी अनुदान

ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करून ५० कोटी अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या मंडळावर मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल आणि संबंधितांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतील.

-----०-----

गृह विभाग

## संगणक गुन्हे तातडीने निकाली निघणार
## सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग प्रकल्प राबविणार

संगणक गुन्हे तातडीने निकाली काढण्यासाठी सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग प्रकल्प राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी ७५ कोटी ८९ लाख ५२ हजार ४०० इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. यामध्ये संगणक गुन्हे विभागातील प्रलंबित प्रकरणांचे विश्लेषण करण्यात येऊन जलद निपटारा करण्यात येईल.

-----o------

गृह विभाग

## राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करणार

राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्यासाठी एसपीव्ही (स्पेशल पर्पज व्हेईकल) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी २३ कोटी ३० लाख ५० हजार इतकी रक्कम भाग भांडवल म्हणून देण्यात येईल. यासाठी राज्य शासन नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था आणि मे.पिनाका टेक्नॉलॉजी खासगी मर्यादित यामध्ये करार करण्यात येईल.

-----o-----

महसूल विभाग

## भुलेश्वरची जागा जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला
## जिमखान्यासाठी वाटप

भुलेश्वरची जागा जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला जिमखान्यासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

जैन इंटरनॅशनल ही संघटना आंरराष्ट्रीय पातळीवर नामांकित असून समाजाच्या सर्वच क्षेत्रात कार्यरत आहे. या संघटनेला १०२५७.८८ चौ.मी. जागा जिमखान्यासाठी देण्यात येईल.

-----o-----

गृह विभाग

## संगणकीय न्याय सहाय्यक विज्ञान उत्कृष्टता केंद्र उभारणार
## गुन्ह्यांची वेगाने उकल करणार

संगणकीय न्याय सहाय्यक विज्ञान उत्कृष्टता केंद्र उभारुन गुन्ह्यांची वेगाने उकल करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी ४१ कोटी ६६ लाख १२ हजार अशा खर्चास तसेच एकूण १९ तांत्रिक पदे निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----o-----

सामान्य प्रशासन विभाग

## राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कल्याण केंद्रासाठी २० कोटी अतिरिक्त निधी मंजूर

राजपत्रित अधिकारी महासंघाच्या अंधेरी तालुक्यातील मौ.वांद्रे येथील कल्याण केंद्रासाठी २० कोटी अतिरिक्त निधी मंजूर करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या इमारतीसाठी ८८ कोटी १७ लाख इतका खर्च अपेक्षित असून आज २० कोटी अतिरिक्त निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी राजपत्रित अधिकारी महासंघाने विनंती केली होती.

-----०-----

महसूल

## श्रीगोंदा तालुक्यातील शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित

श्रीगोंदा तालुक्यातील शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

बेलवंडी मळ्यातील म्हणजे पार्वतीवाडी येथील १७८.७४ हे.आर. आणि मौ.पिसोरे बुद्रूक ७३.६९ हे.आर. अशा शेती महामंडळाच्या २५२. ४३ हे.आर जमीन नवीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता विनामुल्य देण्यात येईल.

-----०-----